# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

करोना व्हायरसमुळे मिस्साला न जाऊ शकणाऱ्यांसाठी घरी करावयाची प्रार्थना

**गुरूवार – ११ जून २०२० – संत बार्नाबस, प्रेषित**

## दूताचा मरियेला संदेश

कुटुंब प्रमुख ः प्रभूच्या दूताने मरियेला संदेश दिला

सर्व ः आणि ती पवित्र आत्म्याच्या योगाने गर्भवती झाली

कुटुंब प्रमुख ः नमो कृपापूर्ण मरिये .... .

कुटुंब प्रमुख ः पहा मी प्रभूची दासी आहे

सर्व ः तुझ्या शब्दाप्रमाणे माझ्याठायी होवो

कुटुंब प्रमुख ः नमो कृपापूर्ण मरिये .... .

कुटुंब प्रमुख ः आणि देवशब्द मनुष्य झाला

सर्व ः आणि आम्हामध्ये राहिला

कुटुंब प्रमुख ः नमो कृपापूर्ण मरिये .... .

कुटुंब प्रमुख ः खिस्ताने दिलेल्या वचनास आम्ही पात्र व्हावे म्हणून

सर्व ः हे पवित्र देवमाते, आम्हासाठी विनंती कर.

**आपण प्रार्थना करू या** ः हे प्रभो, तुझ्या पुत्राच्या देहधारणाचा संदेश दूताने आम्हाला दिला. त्याच्या दुःखसहनाच्या व कुसाच्याद्वारे आम्हाला पुनरूत्थानाचे वैभव मिळावे म्हणून आमची मने तुझ्या कृपेने संपन्न कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू खिस्ताद्वारे करतो. आमेन.

गायन ः **प्रभू गाऊ .... . गीत क. ३४**

कुटुंब प्रमुख ः पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा यांच्या नावे

सर्व ः आमेन.

कुटुंब प्रमुख ः परमेश्वर आपले घर आणि हृदय विपुल शांतीने भरीत असतो. आपण त्याची आराधना करू या. परमेश्वर सदैव सुवंदित असो.

सर्व ः परमेश्वर सदैव सुवंदित असो.

### पश्चाताप विधी

कुटुंब प्रमुख ः प्रिय कुटुंबियांनो, या प्रार्थना विधीत सहभागी होण्यास आपण पात्र ठरावे म्हणून आपण आपल्या पापांची आठवण करू या व ईश्वराकडे विश्वासाने क्षमा मागू या.

कुटुंब प्रमुख ः हे प्रभो येशू, परमेश्वराच्या राज्यात लोकांना शांतीने एकत्रित करण्यासाठी तू आलास. हे प्रभो, आम्हावर दया कर.

सर्व ः हे प्रभो, आम्हावर दया कर.

कुटुंब प्रमुख ः आमचे पावित्र्य वाढविण्यासाठी तू शब्द व संस्काराररूपाने येतोस. हे ख्रिस्ता, आम्हावर दया कर.

सर्व ः हे ख्रिस्ता, आम्हावर दया कर.

कुटुंब प्रमुख ः तुझ्या लोकांना मुक्ती देण्यासाठी तू वैभवाने पुन्हा येणार आहेस. हे प्रभो, आम्हावर दया कर.

सर्व ः हे प्रभो, आम्हावर दया कर.

कुटुंब प्रमुख ः सर्वसमर्थ परमेश्वर आम्हांवर दया करो व आमच्या पापांची क्षमा करून आम्हाला सार्वकालिक जीवनाकडे नेवो.

सर्व ः आमेन.

### आपण प्रार्थना करू या ः

हे परमेश्वरा, आमच्या सर्वसमर्थ बापा, श्रद्धेने व पवित्र आत्म्याने तू संत बार्नाबस ह्यास परिपूर्ण केलेस व सुवार्तेच्या प्रचारासाठी लोकांमध्ये पाठविले. आम्ही आमच्या शब्दांनी व कृत्यांनी सुवार्तेचा प्रचार करावा म्हणून आम्हाला साहाय्य कर. ही प्रार्थना आम्ही, तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

सर्व ः आमेन.

### प्रभूशब्दविधी

**पहिले वाचन ः** **प्रेषितांची कृत्ये ११ ः २१ – २६, १३ ः १ - ३**

**वाचक** ः प्रेषितांची कृत्ये या पुस्तकातून घेतलेले वाचन ः

*“तो थोर मनुष्य होता. पवित्र आत्म्याने व विश्वासाने पूर्ण होता.”*

पुष्कळ लोक विश्वास धरून प्रभूकडे वळले. त्याच्याविषयीचे वर्तमान येरूशलेमातल्या मंडळीच्या कानी आले, तेव्हा त्यांनी बार्नाबसला अंत्युखियापर्यंत पाठवले. तो तेथे पोहोचल्यावर देवाची कृपा पाहून हर्षित झाला आणि त्याने त्या सर्वांना बोध केला की, दृढनिश्चयाने प्रभूला बिलगून राहा. तो थोर मनुष्य होता आणि पवित्र आत्म्याने व विश्वासाने पूर्ण होता. तेव्हा प्रभूला पुष्कळ जण मिळाले. नंतर तो शौलचा शोध करायला तार्सास गेला. त्याचा शोध लागल्यावर त्याला अंत्युखियास आणले. त्यांनी तेथे वर्षभर मंडळीमध्ये मिळूनमिसळून बऱ्याच लोकांस शिकवले आणि शिष्यांस 'ख्रिस्ती' हे नाव पहिल्याने अंत्युखियात मिळाले.

अंत्युखियाच्या मंडळीत बार्नाबस, शिमोन निग्र, लूक्य कुरनेकर, जो बाळपणापासून मांडलिक हेरोद राजाबरोबर वाढला होता तो मनाएन आणि शौल हे संदेष्टे व शिक्षक होते. ते प्रभूची सेवा आणि उपवास करत असता पवित्र आत्मा म्हणाला, "बार्नाबस आणि शौल ह्यांना ज्या कार्यासाठी मी बोलावले आहे त्यासाठी त्यांना माझ्याकरिता वेगळे करून ठेवा." तेव्हा त्यांनी उपवास व प्रार्थना करून त्यांना आशीर्वाद देऊन त्यांची रवानगी केली.

हा प्रभूचा शब्द आहे.

सर्व ः देवाला धन्यवाद.

**प्रतिसाद स्तोत्र ः** स्तोत्र ९७ ः १ - ६

प्रतिसाद ः **परमेश्वराने तारण प्रकट केले आहे.**

१. परमेश्वराचे गुणगान नवे गीत गाऊन करा,
कारण त्याने अद्‌भूत कृत्ये केली आहेत.
त्याच्या उजव्या हाताने आणि पवित्र बाहूने
तारण साधले आहे.

प्रतिसाद ः **परमेश्वराने तारण प्रकट केले आहे.**

२. परमेश्वराने स्वतः सिद्ध केलेले तारण प्रकट केले आहे,
राष्ट्रांसमक्ष आपले न्यायीपण प्रकट केले आहे.
इसरायलच्या घराण्यातील आपली दया आणि सत्यता
यांचे त्याने स्मरण केले आहे.

प्रतिसाद ः **परमेश्वराने तारण प्रकट केले आहे.**

३. पृथ्वीच्या सर्व दिशांनी आमच्या देवाचे तारण पाहिले आहे,
अहो पृथ्वीवरील सर्व लोकहो, उच्च स्वराने, आनंदाने गा.

प्रतिसाद ः **परमेश्वराने तारण प्रकट केले आहे.**

४ . परमेश्वराचे गुणगान वीणेवर करा, वीणेवर सुस्वर स्तोत्र वाजवा .
कर्णा व शिंग वाजवून परमेश्वर राजासमोर जयघोष करा .

प्रतिसाद : **परमेश्वराने तारण प्रकट केले आहे .**

**शुभवर्तमान जयघोष**

आलेलुया, आलेलुया!
हे देवा, आम्ही तुझी स्तुती करतो,
तू प्रभू आहेस हे आम्ही मान्य करतो .
हे प्रभो, प्रेषितांच्या गोरवमय सहवासाबद्दल
आम्ही तुझी स्तुती करतो .
आलेलुया!

**शुभवर्तमान :** **मत्तय १० : ७ – १३**

वाचक : मत्तयलिखित शुभवर्तमानातून घेतलेले वाचन .

सर्व : हे प्रभो, तुझा गौरव असो .

*"तुम्हाला फुकट मिळाले तर फुकट द्या ."*

येशू आपल्या प्रेषितांस म्हणाला, "जात असताना अशी घोषणा करत जा की, 'स्वर्गाचे राज्य जवळ आले आहे .' आजाऱ्यांस बरे, करा मेलेल्यांस उठवा, कुष्ठरोग्यांस शुद्ध करा, भुते काढा, तुम्हाला फुकट मिळाले तर फुकट द्या . सोने, रूपे किंवा तांबे आपल्या कंबरकशात घेऊ नका, वाटेसाठी झोळी, दुसरा अंगरखा, वहाणा किंवा काठी घेऊ नका, कारण कामकऱ्याचे पोषण व्हावे हे योग्य आहे . ज्या ज्या नगरात किंवा गावात तुम्ही जाल त्यात कोण योग्य आहे हे शोधून काढा आणि तुम्ही तेथून जाईपर्यंत त्याच्याच येथे राहा . घरात जाताना 'तुम्हांला शांती असो' असे म्हणा . ते घर योग्य असले तर तुमची शांती त्याला प्राप्त होवो, ते योग्य नसले तर तुमची शांती तुम्हांकडे परत येवो!"

प्रभूचे हे शुभवर्तमान .

सर्व : हे ख्रिस्ता, तुझी स्तुती असो .

**चिंतन ः** देवाच्या सुवार्तेची घोषणा करण्यासाठी किंवा मिशनकार्य करण्यासाठी प्रभूयेशू आपल्या प्रेषितांस पाठवत आहे. फक्त शब्दांद्वारे नव्हे तर आपल्या कार्याद्वारे शुभसंदेश देण्यास त्यांना पाठविण्यात येत आहे. येशूला जे सामर्थ्य प्राप्त झालेले होते तेच सामर्थ्य व त्याची शक्ती तो आपल्या प्रेषितांस देत आहे. येशू हा खरोखर मसिहा आहे आणि जे आजारी व भूतग्रस्त आहेत त्यांना येशूच्या नावाने एका नवीन जीवनाची भेट प्राप्त होणार आहे हे मत्तय सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. लोकांना बरे करून मसिहा देवराज्यांची स्थापना करीत आहे. परंतु प्रेषितांना येशूच्या नावाने कार्य करायचे असेल तर त्यांनी एक महत्वाची अट लक्षात ठेवली पाहिजे, ती म्हणजे त्यांनी ऐहिक गोष्टीवर अवलंबून न राहता फक्त देवावर पूर्ण विश्वास ठेवून त्याच्यावर अवलंबून राहिले पाहिजे. म्हणूनच येशू त्यांना सक्त ताकीद देत आहे की त्यांनी सोने, रूपे, तांबे, झोळी, दुसरा अंगरखा, वहाणा किंवा काठी आपल्याबरोबर घेऊ नये. त्यांच्या ज्या गरजा आहेत त्या परमेश्वर पूर्ण करील असा विश्वास त्यांनी ठेवला पाहिजे. संत बार्नाबस हा खरा मिशनरी होता. आपल्या जीवनाद्वारे त्याने येशूला प्रकट केले. आपण आपल्या जीवनात येशूला प्रकट करतो का?

थोडावेळ शांत राहून आपण चिंतन करू या.

**आपण प्रार्थना करू याः**

हे प्रभो, आम्ही करीत असलेल्या ह्या प्रार्थनेचा तू स्वीकार कर. ज्या प्रेमज्वालेमुळे संत बार्नाबसला सुवार्तेचा प्रकाश जगात पसरविण्याचे सामर्थ्य प्राप्त झाले तीच प्रेमज्वाला आमच्या हृदयात प्रज्वलित कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो.

सर्वः आमेन.

**प्रभूची प्रार्थना**

कुटुंब प्रमुख ः प्रभू येशूच्या शब्दांत आपण परमेश्वर पित्याकडे आत्मविश्वासाने प्रार्थना करू याः

सर्व ः आमच्या स्वर्गीय बापा । तुझे नाव पवित्र मानले जावो । तुझे राज्य येवो । जसे स्वर्गात तसे पृथ्वीवरही । तुझ्या इच्छेप्रमाणे होवो । आमची दररोजची भाकर । आज आम्हाला दे । जशी आम्ही । आमच्या अपराध करणाऱ्यांना क्षमा करतो । तशी तू आमच्या अपराधांची । क्षमा कर । आणि आम्हाला । मोहात पडू देऊ नकोस । पण वाईटापासून । आम्हाला सोडव. आमेन.

शांतीवंदना ः

कुटुंब प्रमुख ः हे प्रभो, सर्व वाईटांपासून आमचे संरक्षण कर. या जीवनात तू आम्हाला शांती दे. आमच्या तारणाऱ्या येशू ख्रिस्ताच्या पुन्हा येण्याची व शाश्वत जीवनाची आशेने वाट पहात असताना आम्ही तुझ्या दयेच्या साहाय्याने पापांपासून दूर राहावे व सर्व संकटापासून सुरक्षित असावे.

सर्व ः कारण राज्य, अधिकार व गौरव सदासर्वदा तुझाच आहे.

कुटुंब प्रमुख ः हे प्रभो येशू ख्रिस्ता, तू आपल्या प्रेषितांस म्हणालास, "मी तुम्हांसाठी शांती राखून ठेवली आहे. मी माझी शांती तुम्हास देतो". म्हणून आमच्या पापांकडे पाहू नकोस तर तुझ्या ख्रिस्तसभेच्या श्रद्धेकडे पहा आणि आम्हाला तुझ्या स्वर्गीय राज्यातील शांती व ऐक्य देण्याची कृपा कर. तू नित्यजिवी असून सदासर्वदा राज्य करतोस.

सर्व ः आमेन

कुटुंब प्रमुख ः प्रभूची शांती आपल्या बरोबर सदा असो.

सर्व ः आणि तुम्हाबरोबर सुद्धा.

कुटुंब प्रमुख ः आपण एकमेकांस शांतीवंदन करू या.

## आध्यात्मिक ख्रिस्त प्रसाद विधी



माझ्या प्रिय येशू,

तू आल्तारावरील पवित्र साक्रामेंतात जातीने हजर असतोस

ह्यावर माझी नितांत श्रद्धा आहे.

सर्वांपेक्षा माझे तुझ्यावर प्रेम आहे आणि

माझ्यामध्ये तू यावा अशी माझी तिव्र इच्छा आहे.

ह्या दिवसात मी तुला पवित्र मिस्सा साक्रामेंताद्वारे स्वीकारू शकत नसलो

तरी निदान आध्यात्मिक स्वरूपात तू माझ्या अंतःकरणात ये.

तू नेहमीच मजबरोबर असतोस.

मी तुला मिठी मारतो.

तुझ्यापासून माझा कधीही वियोग होऊ देऊ नकोस.

आमेन.

**आपण प्रार्थना करू या :**

हे प्रभो, संत बार्नाबसच्या सणाच्या दिवशी सार्वकालिक जीवनाचे प्रतिज्ञापत्र दान मिळालेल्या आम्हा सर्वांची प्रार्थना ऐक. या संस्कारात आम्ही साजरा करीत असलेल्या तारणरहस्यात आम्हाला सहभागी कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.

सर्व : आमेन.

## समारोपविधी

कुटुंब प्रमुख : प्रभू आम्हाला आशीर्वाद देवो, सर्व वाईटांपासून आम्हाला सुरक्षित ठेवो आणि आम्हाला सार्वकालिक जीवनाकडे नेवो.

सर्व : आमेन.

कुटुंब प्रमुख : आपण सर्व ख्रिस्ताच्या शांतीत जाऊ या.

सर्व : देवाचे आभार मानू या.

## कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रार्थना

सर्वसमर्थ व दयावंत परमेश्वरा, सर्व जगाला तू तुझे प्रेम सदैव व सर्वत्र दाखवत असतोस.

कोरोना विषाणुची झळ पोहोचलेल्या ह्या विश्वाच्या विविध भागातील लोकांसाठी आम्ही करीत असलेली प्रार्थना दयेने ऐक.

या रोगाच्या संसर्गामुळे निर्माण झालेली परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी, ह्या आजाराने पछाडलेल्या व्यक्तींना व त्यांच्या कुटुंबियांना आरोग्यदायी स्पर्श लाभण्यासाठी आम्ही तुझ्याकडे कळकळीने याचना करतो.

डॉक्टर्स, नर्सेस व सेवकवर्ग संबंधितांची काळजी घेत आहेत, सेवा पुरवित आहेत, त्यांना ह्या संसर्गापासून सुरक्षित ठेव आणि ह्यापुढेदेखील कार्य करण्यासाठी त्यांना तुझी वृत्ती व पवृत्ती लाभावी म्हणून आम्ही प्रार्थना करतो.

ह्या आजारावर मात करण्याकरिता लवकरात लवकर प्रभावी उपाय शोधता यावा म्हणून संशोधन करणाऱ्या शास्त्रज्ञांसाठी आम्ही तुझी करूणा भाकतो.

लोकांच्या हितासाठी झटणाऱ्या सरकारी व आरोग्य यंत्रणांना ह्या आजारावर मात करण्यासाठी योग्य पावले उचलता यावीत म्हणून आम्ही प्रार्थना करतो.

ही प्रार्थना आम्ही प्रभूख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

गायन ः **ख्रिस्तराज्याची सुवार्ता ......** गीत क्र. १७५